# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 2

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Chief Editor**
**Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)**

**Dr. S. S. Undare (Vice Principal)**
**Dr. G. A. Mohite (Vice Principal)**

**Editor**
**Dr. R. K. Kale**

**Co-Editors**
**Dr. S. N. Akulwar**
**Dr. B. D. Jadhavar**
**Dr. S. E. Ghumatkar**

**Balbhim Arts, Science & Commerce College, Beed**

**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**March 2020 Special Issue- 25 Vol. 2**

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Chief Editor**
**Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)**

**Dr. S. S. Undare (Vice Principal)**
**Dr. G. A. Mohite (Vice Principal)**

**Editor**
**Dr. R. K. Kale**

**Co-Editors**
**Dr. S. N. Akulwar**
**Dr. B. D. Jadhavar**
**Dr. S. E. Ghumatkar**

**Balbhim Arts, Science & Commerce College, Beed**

**Shaurya Publication, Latur**

| | | |
|---|---|---|
| 57. | महिला सबलीकरण आणि भारतीय धोरण<br>डॉ. खेत्री कुंडलिक रघुनाथ, | 215 |
| 58. | जम्मु काश्मिर , कलम ३७० आणि ३५८(अ)<br>लखन बाळु कुंभारे | 218 |
| 59. | “वस्तू व सेवा कर; भारतीय नवआर्थिक युगाची पहाट”<br>लखन देविचंद सुर्यवंशी | 221 |
| 60. | महिला सशक्तिकरण व भारत सरकारचे धोरण<br>लव्हाळे दत्ताराम नारायण | 226 |
| 61. | नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९<br>प्रा.डॉ.बी.बी.लोंखडे | 229 |
| 62. | ''भारतीय संयुक्त कुटूंब पध्दतीचा ऱ्हास''<br>प्रा.डॉ. माया बापूराव मसराम | 234 |
| 63. | दहशतवाद<br>प्रा. मच्छिंद्रनाथ मारुती सुर्यवंशी | 238 |
| 64. | नक्षलवाद : भारतातील एक समस्या"<br>माधव चांदु वाघमारे | 241 |
| 65. | भारतीय संसदीय लोकशाही आणि आघाड्यांचे राजकारण<br>प्रा.डॉ. माधव चोले | 244 |
| 66. | भारतीय संविधान आणि लोकशाही मुल्ये<br>प्रा.मगरे.एम.के. | 248 |
| 67. | भारतीय समाजातील वाढती बेकारी (Unemployment Growth in IndianSociety)<br>प्रा.डॉ. बी.एल. म्हस्के | 251 |
| 68. | दहशतवाद : भारतासमोरील एक आव्हान<br>माने परमेश्वर मुक्तीराम | 253 |
| 69. | वस्तु व सेवांच्या संदर्भात भारताच्या विदेशी व्यापाराची रचना<br>डॉ. वैशाली ल. देशमुख | 255 |
| 70. | भारतातील बेकारी : कारणे आणि उपाय<br>प्रा. आचार्य बालाजी वैजनाथ | 259 |
| 71. | दहशतवादाचे बदलते स्वरूप<br>आकाष शेषराव बांगर | 262 |
| 72. | जातिवाद ( casteism )<br>डॉ. आर. के. काळे, मोरे संजय दिनकर | 265 |
| 73. | महिला सबलीकरणामध्ये शासकीय योजनांचे योगदान<br>श्री. अंबुरे ऋषिकेश सर्जेराव | 270 |
| 74. | भारतीय शेतकरी चळवळ<br>अनिल मारोतराव जाधव | 273 |
| 75. | "भारतातील वाढत्या बेरेजगारीची कारणे व त्यावर सरकारने केलेल्या उपाययोजना"<br>अर्चना विश्वनाथराव आरमाळकर | 275 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 25 , Vol. 2<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


# जातिवाद ( casteism )

**मार्गदर्शक**
**डॉ. आर. के. काळे**
बलभीम कॉलेज, बीड

**संशोधक विद्यार्थी**
**मोरे संजय दिनकर**
बलभीम कॉलेज, बीड

**प्रस्तावनाः—**

भारतीय समाज विकासामध्ये अनेक समस्या आहेत. त्यामध्ये लोकसंख्यावाढ, दारिद्र्य, बेकारी, भ्रष्टाचार, स्त्रीयांवरील अत्याचार, धर्मांधता, नक्षलवाद, दहशतवाद व जातिवाद इत्यादी. समस्यापैकी जातिवाद ही समस्या आज समाजाच्या विकासात आडथळा ठरणारी आहे. भारतीय समाज जातिवादामुळे विभाजित झालेला दिसतो आणि हे फार भयानक आहे. याचे परिणाम समाजातील प्रत्येक घटक सोसत आहे. या जातीभेद समस्यामुळे संपूर्ण समाज तुकड्यात वाटला गेला आहे. जातिवादामुळे समाजिक विकासात आडचणी निर्माण होताना दिसत आहेत. जातिवादाच्या समस्याने सामाजिक व राजकीय घटकांवर मजबूत पकड निर्माण केली आहे. जातिव्यवस्थेमुळे ग्रामीण भागात सामाजिक, आर्थिक, धार्मिक कामाचे मोठ्या प्रमाणात विभाजन झाले आहे. त्यामुळे समाजाने जातिवाद या भेदामुळे होणारे नुकसान लक्षात घ्यायला पाहिजे तो पर्यंत भारतीय सामाजाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय विकास होऊ शकत नाही.

जातीव्यवस्थेमुळे संपूर्ण देशाची शांतता भंग होत आहे. मग ती आर्थिक, समाजिक व राजकीय आसो, त्यामुळे जातीवादाला पूर्ण विराम देणे खूप गरजेचे बनले आहे. जातिवाद या समस्यामुळे समाजात अनेक दंगली, अमानुष्य बलात्कार, सामाजिक दुरावा होत चालेला आहे. या कारणाने भारतीय समाजाचे आर्थिक, सामाजिक व राजकीय नुकसान होत चालले आहे. आज देशात जातिवाद नावाचा भेसूर राक्षस मुक्तपणे संचार करतांनी आपल्याला दिसून येतो, पण आपण ह्या राक्षसाला समुळ नष्ट करु शकतो की नाही ही मोठी समस्या आपल्या समाजा समोर निर्माण झाली आहे.

भारतीय समाजाचा इतिहास फार प्राचीन म्हणजे इ.स. पूर्व 4000 वर्षाचा आहे. भारतीय समाज व्यवस्था ही पूर्ण चातुर्वण्य पद्धतीवर आधारित आहे. या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास त्या काळाच्या ओघात वर्णव्यवस्थेचे स्वरुप परिस्थितीनुरुप बदलत गेले. याच वर्णव्यवस्थेवर आधारित भारतीय समाजामध्ये जातीव्यवस्थेची उतरंड निर्माण झाली. भारतीय वर्ण व्यवस्थेत ब्राम्हण, क्षेत्रिय, वैश्य व शुद्र या वर्णांचा समावेश होतो. या जाती व्यवस्थेने समाजात मोठ्या प्रमाणात भेदभाव निर्माण केले आहे. जातीभेद जातिसंस्था आणि जातिनिष्ठा ही हिंदू समाजाची व्यवच्छेदक घटक आहेत. जातीव्यवस्थेमुळे समाजातील सामाजिक व धार्मिक स्थिती ही पूर्ण परंपरेच्या सामाजिक व धार्मिक नियमांना बांधील असलेली दिसते. पूर्वी पासून समाजात वर्ण व्यवस्था व जातीव्यवस्थेची बंधने बळकट होती. त्यामुळे हिंदू समाजात चातुवर्ण्य वर्गाचे स्थान बळकट होते. वैदिक काळापसून भारतीय समाज जीवनात आपआपल्या जातीत व्यवहार व्यवहार करीत जगत आला आहे. तरी पण समाज जीवनात चौथ्या वर्गातील लोकांवर धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय, संस्कृतिक आन्याय होताना दिसतो.

भारतीय समाज सुधारकांपैकी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. कारण अनेक वर्षापासून मागस दलित—आदिवासी जातीनवर होणाऱ्या आन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य यांनी केले आहे. समाजातील खालच्या जातींना कोणतेच आधिकार नव्हते. सार्वाजणीक ठिकाणी जाण्यास, शिक्षण घेण्यास बंदी, समाजात वावरण्याची बंदी, सार्वजनीक ठिकाणी पाणी पिण्यास बंदी इत्यादी. कारणाने ह्या समाजाचे आतोहात नुकसान झाले होते. चातुर्वण्य व्यवस्थेमुळे तत्कालीन समाजिक विषमता अस्पृश्यता, अंधश्रद्धा आणि चालीरीती शिगेस पोहचल्या होत्या सामाजिक जातीत धार्मिक आन्यायाने बहुजन समाज भरडला जात होता. धर्माच्या, जातीच्या नावाखाली समाजाचे मोठ्या प्रमाणात शोषण सुरु होते इत्यादी समस्यांच्या बाहेर या समाजाला काढण्याचे कामे महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक विचारातून अस्पृश्यता व जातीयव्यवस्थेच्या विषमतावादी स्वरुपात निर्माण झालेल्या विविध सामाजिक समस्यांची स्पृश्यांना व अस्पृश्यांना जाणीव करुन देऊन सामाजिक परिवर्तणास प्रेरित केले. त्यांचे मते ''हिंदू समाजात जाती शिवाय गत नाही आणि जन्माशिवाय जात नाही. व त्याशिवाय मानुस नाही. त्यामुळे या हिंदू समाजास कोणीही परधर्माचा माणूस येण्यास धजत नाही. जातीभेद व जातिवाद हेच हिंदू धर्म व हिंदू सामाजाच्या अन्याचे मूळ कारण आहे असे परखंड विचार डॉ. बाबासाहेब यांनी मांडले आहेत. जातीव्यवस्था ही विघटनात्मक असून ती वर्णव्यवस्थेतून निर्माण झाली असा सामाजशास्त्रीय सिद्धांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडला आहे. त्यांच्या मते भारतीय समाजाला कायदेशीर स्वतंत्र्यापेक्षा सामाजिक व जातीय स्वातंत्र्याची जास्त गरज आहे. कारण कायदेशीर हक्काला अस्पृश्य समाजाची आडकाठीव हरकत असेल तर तो हक्क कायद्याने दिला असला तरी त्याचा काही उपयोग नाही. त्यामुळे सामाजिक स्वतंत्र्य जो पर्यंत प्राप्त होत नाही तो पर्यंत कायदेशीर स्वातंत्र्याचा उपयोग घेता येणार नाही.

**उदिष्ट्येः–**

1. समाजातील विविध जातींचा अभ्यास करणे.
2. जातिवादामुळे समाजावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
3. समाजातील राजकीय जातिवाद अभ्यासणे.

**जातीचा अर्थः–**

'जात' या शब्दाला इंग्रजीत ''Caste'' असे म्हणतात. ''Caste'' हा शब्द ''Casta'' या लॅटिन शब्दापासून बनला आहे. ''Casta'' या शब्दाचा अर्थ 'प्रजाती किंवा जन्मभेद' असा होतो. म्हणून 'जात' ही 'जन्मभेदाच्या आधारावर निर्माण झालेली व्यवस्था होय' असे म्हणता येईल.

**जातिची व्याख्याः–**

1. **''मजुमदार''** यांच्या नुसार 'जात एक बंद वर्ग' आहे.
2. **''घुर्ये''** यांच्या नुसार 'जात ही अशी स्तरीकरणाची व्यवस्था आहे. ज्याच्या सदस्यत्वासाठी त्या स्तरित गटात जन्म घेणे अवश्यक आहे. म्हणजे जात ही त्या विशिष्ट जातीतच जन्माला आल्याने मिळते.

**सामाजिक जातिवादः–**

**समाजातील जातीसंस्था संसर्गजन्य रोग आहे :–**

समाजातील जातीव्यवस्था मानसाने माणूसपणा नाकारणारी आणि माणसांना श्रेष्ठ–कनिष्ठतेचा व सोवळ्या–ओवळ्याचा संसर्गजन्य रोग लावणारी विषारी रचना व कावस्था आहे. जातीने अनेक प्रकारचे कठोर निर्बंध घालून माणसाच्या माणुसकीची अहार्निश विटंबना चालविली आहे.

**समाजात जातीभेद सार्वजणीक ऋणानुबंध निर्माण होऊ देत नाही :–**

समाजशास्त्रवित्ते सांगतात की जातीभेदामुळे समाजाची स्थिती खिळखिळ झाली आहे. जातीय जगणं, जातीत मरण, जातीत जेवण, जातीत लग्न आशी समाज रचना असल्यामुळे सार्वजणीक कार्य जातीबाह्य ठरवून ती कारणे निषिध मानले जाते. एकीची भावना जातीभेद निर्माण होऊ देत नाही यामुळे एक जात दुसऱ्या जातीला परकी वाटते.

**समाजाचे खंडात्मक विभाजनः–**

जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाजाची असंख्य खंडात विभागणी झाली. या प्रत्येक खंडात प्रत्येक जातीच्या सदस्यांचे स्थान व दर्जा हा त्याच्या द्वारा निश्चित झाला आहे. प्रत्येक गटात श्रेष्ठ–कनिष्ठतेवर आधारित संबंध निर्माण झाले आहे. जातीसंस्थेमुळे भारतीय समाजाचे विविध जातींच्या समुहांमध्ये विभाजन झालेले आहे. हे विभाजन टिकून ठेवण्याकरीता जातीचे कडक निर्बंध कारणीभूत असल्याचे दिसते.

**सोपान परंपरा :–** जातीव्यवस्थेत एक अधिक्रम आढळतो. निरनिराळ्या जातींना विशिष्ट दर्जा असतो. त्यानुसार श्रेष्ठ–कनिष्ठत्वार आधारलेली एक सोपांन परंपरा आढळते. विशेष म्हणजे ही श्रेष्ठ–कनिष्ठता जन्मदात आहे. जातीसंस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक जात खालच्या जातीपेक्षा श्रेष्ठ आणि वरच्या जाती पेक्षा कनिष्ठ आहे.

**सामाजिक व धार्मिक अयोग्यता आणि विशेषाधिकार :–**

जाती व्यवस्थेत सर्व जाती समान नव्हत्या, जातिव्यवस्था ही एक श्रेष्ठ–कनिष्ठत्वार आधारलेली श्रेणीरचना असून प्रत्येक जातींना एक विशिष्ठ स्थान दिलेले आहे. श्रेष्ठ–कनिष्ठतेनुसार जातींच्या लोकांचा सामाजिक दर्जा, विशेषाधिकार आणि योग्यता निश्चित होते.

**जातीव्यवस्था ही नकारात्मक आहे :–**

जातीयतेने निर्माण केलेले शत्रूत्व यामुळे एकमेकांमध्ये वैरत्व, दुजाभाव आणि भेदभाव वृद्धांगत होतात. यामुळे समाजात एकोपा निर्माण होत नाही. ना भाईचारा निर्माण होतो. प्रत्येक जात आपल्या जातीचा अभिमाण बाळगते त्यामुळे एका जातीला दुसऱ्या जातीबद्दल आपुलकीची भावना मुळीच नाही. स्वतःच्या जातीचे हित साधण्यासाठीची प्रवृत्ती मग ती सामाजिक, आर्थिक या राजकीय असो हे प्रत्येक जातीचे मुख्य वैशिष्ट्य बनलेले आहे.

**राजकीय जातिवादः–**

समग्र भारतात अनुसूचित जाती व जमातीवरील होणारे जातीय हाल्यांनी आता संघटीत स्वरुप प्राप्त झाले आहे. यामागे केवळ जातीय अहंकार नसून राजकीय वर्चस्व कायम राखण्यासाठी जातीवादी वृत्ती आहे. दिवसेन दिवस मागास दलित, आदिवासी जातींवर होणाऱ्या आत्याचारांमध्ये कमालीची वाढ झालेली दिसून येते. आत्याचार पिडीतामध्ये बहुतांश समाज हा आनु जाती व आनु जमातीतील असतो. हा समाज या आगीच्या भक्षस्थानी पडलेला आढळतो. या जातींवर होणाऱ्या जातीय हाल्यांना आता राजकीय संघटित स्वरुप प्राप्त झाले आहे. यामागे राजकीय वर्चस्व कायम राखण्याचे जातीवादी वृत्ती आहे. याचे कारण म्हणजे भारतीय राज्यघटनेमुळे मागास जातीतील नवीन पिढीत निर्माण झालेली प्रगती होय. आज मागास जातींना भारतीय राज्यघटनेच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आरक्षण धोरणामुळे सत्तेत स्थान मिळाले आहे. परंतु जाती व्यवस्थेमुळे राजकारणातही त्यांना प्रभावशाली जातीच्या अधिपत्याखाली आपली राजकीय सत्ता भोगावी लागते. त्यामुळे ते आपल्या आन्यायग्रस्थ सामाजाकडे राजकीय दृष्टिकोनातून बघताना दिसून येतात.

राजकीय सत्तेत बसलेले लोक आपली सत्ता मजबुत करण्याकरीता जातीय विचारांचा उपयोग करुण घेतात. कारण जातिवाद हा मतदान कमवायचे साधन बनले आहे. अनेक लोक आपल्याच जातीच्या नेत्याला मतदान करतात या कारणाने प्रदेशानुसार बहुसंख्यक जातीच्या नेत्याला महत्त्व राहते. मग तो सामाजिक कार्य करीत असो या नसो. लोक आपल्या जातीचा मोठेपणा राखण्याकरिता मतदान करतात. त्यामुळे जातीचे राजकारण अधुनिककरणाच्या मार्गामध्ये आडथळा ठरत आहे. लोक राष्ट्रीय हिताला विसरुन जातीत हिताला महत्त्वपूर्ण मानू लागले आहे. भारतीय जनता ही जातीच्या आधारावर संघटित होताना दिसते. राजकीय नेते सत्ता प्राप्त करण्यासाठी जातीय संगठणाचे उपयोग करतात. आज भारतीय राजकारण जातीच्या आसपास फिरतानी दिसते. या कारणाने जातिवाद ही समस्या देश, समाज व राजकारणाला हानिकारक ठरत आहे.

**भारतीय राज्यघटनाः–**

भारतीय राज्यघटनेत सामाजिक समानता आनण्यसाठी, जातिवाद, धर्मवाद, वर्णवाद नष्ट करण्यासाठी महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहे. कलम 15 मध्ये राज्य नागरीकामध्ये वंश, धर्म, जात, जन्मस्थान, लिंग यापैकी कोणत्याही गोष्टीच्या आधारे भेदभाव करणार नाही. त्याच प्रमाणे कलम 17 मध्ये अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा मानला जाईल. तसेच कलम 29 नसार धर्म, वंश, जात, भाषा या किंवा या पैकी कोणत्याही कारणाने

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 25 , Vol. 2<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

कोणत्याही नागरिकास शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश नकारला जाणार नाही व 38 व्या कलमामध्ये लोकसंख्याच्या कल्याणसाठी ज्या सामाजिक व्यवस्थेत सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय असेल आशी सामाजिक व्यवस्था निर्माण करुण ती टिकवून धरण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**सारांशः—**

भारतीय समाजाला जातिवादी समस्याच्या बाहेर निघायचे असेलतर जातिवादी ही भावना नष्ट करणे खूप गरजेचे आहे. तरच भारतीय समाजाचा विकास होऊ शकतो. भारतीय समाजामध्ये जातीच्या आधारावर सामाजिक लूट, दमन, आन्याय, अत्याचार, जातीय भेदभाव विरुद्ध संघर्ष करणे खूप गरजेचे आहे. त्यासाठी सामाजिक बांधीलकी जपने गरजेचे आहे. जाती आधारित संघटन न बनविने, सोशीतांच्या सोबत मिळून संघर्ष करणे, आतंर जातीय विवाहास मान्यता देणे, जातिवादी तत्व नष्ट करणे, भारतातील राज्य घटनेने मानवाला दिलेले मुलभूत अधिकरांचे पालन करणे, तरच भारतीय समाज व्यवस्थेमधून जातिवाद नावाची समस्या नष्ट होऊ शकते.

**संदर्भ यादी :—**

1. Bayly, susan, caste society and politics in india from the eighteenth century to the modern age- canbridge university press. 2001
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारीताः एक समाजशास्त्रीय विश्लेषण, विजया खंडाळे—इंगोले, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद. 2 मार्च 2007.
3. समता संघर्ष मार्गदर्शिकाः संपादक सुनिल दिघे, लोकवाङ्मग गृह, मुबई. 2016
4. महा—महात्मा जोतीराव फुले व्यक्ती व कार्य , राम कांडगे, राजश्री प्रकाशन 2004
5. जातीसंस्थेच उच्चाटन— डॉ. भी. रा. आंबेडकर आनंद प्रकाशन औरंगाबाद, 26 नव्हों. 2013
6. www.wikipediice.org. casteism